मराठवाडा पॅकेज अंतर्गत जालना जिल्ह्यात २० शेळया + २ बोकड असा शेळी गट वाटप करणे ही पथदर्शी योजना सन २०१६-१७ मध्ये राबविण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग
शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र. २३८/पदुम-४,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २५ ऑक्टोबर, २०१७.

वाचा : १. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१६/ प्र.क्र. २३८/पदुम-४, दि.१५.१०.२०१६
२. सामान्य प्रशासन विभागाचे पत्र दि.२४.१०.२०१७ अन्वये दि.१०.१०.२०१७ रोजी पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीचे निर्गमित केलेले कार्यवृत्त

शासन शुध्दीपत्रक :-

वाचा येथील दि. १५.१०.२०१६ च्या शासन निर्णयामधील पृष्ठ क्र. १ व २ येथील योजनेंतर्गत देय अनुदान येथे नमूद "सदरचे अनुदान प्रकल्प स्थापनेच्या पहिल्या वर्षांनंतर २० टक्के, दुसऱ्या वर्षांनंतर २० टक्के व उर्वरित १० टक्के अनुदान तिसऱ्या वर्षांनंतर जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जालना यांचेमार्फत थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावे." तसेच, पृष्ठ क्र. ४ वरील बॅक एन्डेड सबसिडी वितरीत करण्यासाठी समिती येथे नमूद "या योजनेतर्गत देय असलेले एकूण ५० टक्के अनुदान प्रकल्प स्थापनेच्या पहिल्या वर्षानंतर २० टक्के, दुसऱ्या वर्षानंतर २० टक्के व उर्वरित १० टक्के अनुदान तिसऱ्या वर्षानंतर थेट लाभार्थ्यांच्या बँक अकाउंटमध्ये जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जालना यांच्यामार्फत जमा करण्यात यावे." या ऐवजी **"या योजनेंतर्गत सर्व प्रवर्गातील लाभार्थीना ५० टक्के अनुदान (Back Ended) देय असून सदरचे अनुदान गट स्थापनेच्या पहिल्या वर्षी पहिल्या सहा महिन्यात २५ टक्के व उर्वरित २५ टक्के अनुदान दुसऱ्या सहा महिन्यात थेट लाभार्थ्यांच्या बँक अकाउंटमध्ये जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जालना यांच्यामार्फत जमा करण्यात यावे"** असे वाचावे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असुन त्याचा संकेतांक क्र. २०१७१०२५१६४६०३३७०१ असा आहे. सदर शासन शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shri Ravindra Gurav

Digitally signed by Shri Ravindra Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, cn=Shri Ravindra Gurav
Date: 2017.10.25 16:33:32 +05'30'

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई-३२.
२) मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई-३२.
३) मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई-३२.

४) आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-७.
५) विभागीय आयुक्त, औरंगाबाद.
६) जिल्हाधिकारी, जालना
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना.
८) प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
९) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला.
११) प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, (सर्व).
१२) जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, जालना.
१३) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, जालना.
१४) निवड नस्ती (पदुम-४).